रे.क.नं. ३२४/२०१८
निशाणी क्र. ४२ सोबत.

**वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही.बी. चव्हाण यांचेमार्फत प्रतिवादीचा शपथेवर उलटतपास सुरू.**

माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले आहे. विलास केशव पाटील यांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे मुळ मालक तातोबा आण्णासो पाटील होते. कवडे, बिरांजे या मुळ कुटुंबातील पुरूष पाटील घराण्यामध्ये दत्तक म्हणून आले किंवा कसे मला माहीत नाही. आता मला नि.२७ वरील गट नं.३३१ चा ७/१२ दाखवला तो बरोबर आहे. आता मला नि.६३ वर दाखल अ.नं.१ वरील गट नं.३३१ दि.१७/०९/२०२५ रोजीचा ७/१२ उतारा दाखवला. तो बरोबर आहे. त्यास नि. ६४ दिली. हे म्हणणे खरे आहे की, तात्यासो पाटील यांनी गट नं. ३३१ मधील काही क्षेत्र शाळेला विक्री केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या शाळेमध्ये अलीकडेच मी नोकरीस लागले. माझ्या सास-यांचे नाव आण्णासो तातोबा पाटील असे आहे. (साक्षीदार सांगते की, तिचे सासरे अपंग होते) हे म्हणणे खरे आहे की, माझे सासरे मनोरूग्न होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासरे मनोरूग्न असल्यामुळे त्यांनी त्यांच्या नावची रूई गट नं.३३१ ची जमीन माझे पती देवेंद्र पाटील यांच्या नावे केली. मी राजकुमार बापुसो मडके यांना कोणतेही खरेदीपत्र करून दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.२७ व नि.६४ वरील ७/१२ उता-यामध्ये राजकुमार बापुसो मडके यांना १० गुंठे जमीन दिल्याची नोंद आहे. राजकुमार मडके यांना माझ्या पतीने १० गुंठ्यांचा खरेदी करार करून दिला असेल. त्या कराराप्रमाणे माझे पती देवेंद्र पाटील मडके यांना १० गुंठ्यांचे खरेदी पत्र करून दिले किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, रूई गट नं.३३१ मध्ये २७ लोकांची नावे नमूद आहेत. सदरच्या २७ लोकांपैकी किती लोकांनी तेथे घरे बांधली हे मला माहीत नाही. गट नं.३३१ ची जमीन दररोज माझ्या पाहण्यात आहे. सदरच्या जमीनीमध्ये ५० एक लोकांची घरे आहेत किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या जमीनीतून ग्रामपंचायतीचा रस्ता व त्या रस्त्याला लाईट आहे. सदरच्या गटातील २७ एक लोक त्यांच्या घरात काय करतात हे मला माहीत नाही. गट नं.३३१ च्या ७/१२ उता-या मध्ये २७ लोकांची नावे कशी आली याची चौकशी मी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, देवेंद्रनेच तुकडे पाडून २७ लोकांना सदरच्या गटातील जमीनी विकल्या. हे म्हणणे खरे आहे की, देवेंद्र शेती करत होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कुटुंबाला शेतीचेच उत्पन्न होते. हे म्हणणे खरे आहे की, मला देवेंद्र पासून स्वप्नाली व स्वप्नील अशी दोन मुले आहेत. स्वप्नालीचे शिक्षण १० वी पर्यंत झाले आहे. स्वप्नील गतीमंद असल्याने त्याचे काहिही शिक्षण झालेले नाही. आमचे लग्न झाले त्यावेळी आण्णासो (सासरे)

हयात होते. माझ्या सास-यांवरती ऑपरेशन नंतर औषधोपचार चालू होता. माझे लग्न सन १९९४ साली देवेंद्रशी झाले. आमचे लग्न झाल्यापासून देवेंद्रने गट नं.३३१ मधील कोणतेही क्षेत्र विक्री केलेले नाही. आमची काही शेती भागाने घाटगे म्हणून करणा-या इसमास मी ओळखते. घाटगे माझी सर्व शेती पाहतात. तात्यासो, आण्णासो व देवेंद्र यांच्या मयताचा खर्च आमच्या घरच्यांनी केला. देवेंद्रच्या लग्नाचा खर्च त्याच्या घरच्यांनीच केला. आमच्या मुलांच्या बारश्याचा, जावळ काढण्याचा, शिक्षणाचा, इ. खर्च आम्हीच केला. माझ्या बाळंतपणाचा खर्च माझ्या आई-वडिलांनी केला. देवेंद्र यांचे शिक्षण १० वी पर्यंत झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, देवेंद्र एक हिशोबी व्यक्तीमत्व होते. त्यामुळे देवेंद्र येणा-या व जाणा-या पैशांची साधी नोंदवही ठेवत होते किंवा कसे हे मला माहीत नाही. मी देखील तशी खर्चाची नोंदवही ठेवत नाही. देवेंद्रने तशी नोंदवही ठेवली असेल तर ती शोधून प्रस्तुत कामात हजर करण्यास मी तयार आहे.

**मध्यांनामुळे उलटतपास तहकूब.**

साक्षीदाराचा जबाब माझ्या समक्ष नोंदवण्यात आला. श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

दिनांक : ०६/०१/२०२६. **(एम.एस.गावडे)**
ठिकाण : इचलकरंजी. **५ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, इचलकरंजी.**